| **PUBLICATION** : Vishwadarpan | **PAGE NO**. 4 |
|---|---|
| **CITY**: Pune | **DATE** : 18.03.2020 |

# जान्हवी कपूरने मिंट चॉकॉनसोबत दिली हिंट



पुणे : चॉकलेटस्ना मिंटी चव देत महक समूहाने कँडी मिंट चॉकॉनच्या आणखी एक स्वाद लाँच केला आहे. मिंट चॉकॉन ही मिंटच्या स्वादाची अशाप्रकारची पहिलीच कँडी असून तिचे बाह्य आवरण मिंटचे, तर आतील गाभा चॉकलेटने बनवलेला आहे. मिंट चॉकॉनच्या भव्य लाँचसाठी ब्रँड अॅम्बेसिडरपदी जान्हवी कपूर यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा समावेश असलेले 'मिंट नही हिंट है' ही जाहिरात तयार करण्यात आली आहे. जाहिरातीच्या सुरुवातीला संध्याकाळच्या प्रकाशात जान्हवी आणि एक मुलगा इमारतीच्या कठड्यावर बसलेले दिसतात. हे जोडपं त्यांच्या पहिल्या रोमँटिक टप्प्यावर आलेलं असतं. पहिलीच डेट असल्यामुळे नेमकं काय करायचं हे दोघांनाही समजत नसतं. काहितरी संवाद साधण्यासाठी म्हणून जान्हवी विचारते, 'सो, और क्या करते है फर्स्ट डेट पे?'. त्यावर तो मुलगा म्हणतो, 'पता नही, मेरा भी तो ये फर्स्ट टाइम है.' मग, जान्हवी त्याला मिंट चॉकॉन देते आणि आश्चर्यचकित होऊन तो विचारतो, 'मिंट?' जान्हवी लाजून म्हणते, 'ये मिंट नही हिंट है'. तिचा इशारा ओळखून तो मिंट चॉकॉनचा आस्वाद घेतो आणि जान्हवीकडे झुकतो. महक समूहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणाले, 'आजच्या स्पर्धात्मक युगात ग्राहकांची निष्ठा टिकवून ठेवणे फार अवघड झाले आहे. इच्छित ग्राहकवर्गाच्या मनात आपले वेगळेपण ठसवण्यासाठी सतत काहितरी नवीन देत राहणे हे प्रत्येक ब्रँडसाठीच महत्त्वाचे झाले आहे. हेच लक्षात ठेवून आम्ही मिंट चॉकॉनची निर्मिती केली आहे. मिंट चॉकॉन ही नाविन्यपूर्ण संकल्पना आहे. आम्ही हे उत्पादन तयार करण्यासाठी जर्मन तंत्रज्ञानाचा अवलंब केला आहे. मिंट चॉकॉन हे उत्पादन किशोरांपासून तरुण, नोकरदारांपर्यंत प्रत्येकाला आवडेल असे आहे. ब्रँडचा चेहरा म्हणून जान्हवी कपूर यांची नियुक्ती करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. हे सहकार्य आमच्यासाठी खूप फायदेशीर ठरणार आहे, कारण त्या उद्योन्मुख कलाकार आहेत आणि आमच्या इच्छित ग्राहकवर्गाला त्या आपल्याशा वाटतात. मिंट चॉकॉनशी झालेल्या सहकार्याबद्दल जान्हवी कपूर म्हणाल्या, 'मला गोड खायला खूप आवडतं. खरंतर काही वेळेला मला उठल्या उठल्या आइस्क्रिम खावंसं वाटतं. माझे आई-वडील मी आणि बहिण खुशीवर खूष असले, की आम्हाला भरपूर कँडीज आणि चॉकलेट्स आणायचे. त्यामुळे आज मिंट चॉकॉनशी नाते जोडताना मला खूप आनंद होत आहे. ही नाविन्यपूर्ण संकल्पना आहे. मला खात्री आहे, की मिंट चॉकॉन लवकरच सर्वांचे आवडते होईल.'